**राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ**

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. २०४०/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. दत्तात्रय रंगराव गरुड, रा. मु. पो. पिंपरखेड, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२४१०९. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपरखेड, ता. नांदगाव, जि. नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रा. पं.), पंचायत समिती कार्यालय, नांदगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक – ११/१२/२०२४**

१. **उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

२. **व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ११/०४/२०२२

(२) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अर्जाकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष करुन मला विहीत मुदतीत हवी असलेली माहिती न पाठविल्याने व अजूनपर्यंत अपिल अर्जाची सुनावणी झालेली नाही व तशी तारीख पण कळविणेत आलेली नाही.

(३) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : शास्ती लावुन शिस्तभंगाची कारवाई व्हावी.

३. **माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०१/०२/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : -------------

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : मागील २/३ महिन्यांपूर्वीच.

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१. मागील काही थोड्या, महिन्यांपूर्वी, पिंपरखेड गांवातील २००/२२५ लोकांना (कि जे बेघर आहेत) शासना मार्फत, मा. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ह्या योजनेतून घरकुले मंजूर झालेली आहेत, अशा लाभार्थ्यांची नावानिशी यादी आपणाकडे उपलब्ध आहेत. (परंतु सदरची यादी आपण ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर लावण्याचे मुद्दामहून टाळले आहे.) माझी मागणी अशी की, वरील योजनेतून ज्यांना शासनामार्फत अशी घरकुले मंजूर झालेली आहेत. त्या सर्व लाभार्थ्यांची नावानिशी यादी मला पाठवावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २१/०३/२०२२

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१/०३/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : जाणीव पूर्वक दुर्लक्ष करुन मला माहिती दिलेली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८/०२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये अपिलार्थी यांना सुनावणीवेळी माहिती पुरविलेली असल्याने प्रथम अपिल निकाली काढले असल्याचे दिसून येते.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –** सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिल निर्णयानुसार दि. ०४/०४/२०२२ च्या पत्रान्वये वरिष्ठ

कार्यालयाकडून प्राप्त असलेली माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थी मयत आहे तसा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा मयत दाखला आयोगास सादर केलेला आहे.

६. **निष्कर्ष –**

१. अपिलार्थी यांनी केलेल्या माहिती अर्जामध्ये माहितीचा विशिष्ट कालावधी नमूद केलेला नसल्याने माहितीचा अर्ज मोघम होत आहे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती नांदगाव यांनी प्रथम अपिल अर्जावर दि. २८/०२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते.

३. अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल निर्णयानुसार दि. ०४/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

४. माहितीचा अधिकार हा भारताच्या सर्व नागरिकांसाठी असून प्रस्तुत प्रकरणातील अपिलार्थी हे मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे द्वितीय अपिल निकाली काढणे क्रमप्राप्त आहे.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक २०४०/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. ४४०४

03 JUN 2025